शुद्धीपत्रक-उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळातील उपजिल्हा रूग्णालय, वसमत, जि.हिंगोली येथील दंत चिकित्सा विभागातील २ अस्थाई पदांना मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन शुद्धीपत्रक क्रमांकः अपदे-२०१५/प्र.क्र.१९१/आरोग्य-४
मंत्रालय, १० वा मजला, कॉम्पलेक्स बिल्डींग,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई.
तारीख: १५ जानेवारी, २०१६.

वाचा

१) **शासन निर्णय, सा.आ.वि., समक्रमांकः दि.८.१२.२०१५.**
२) **सहसंचालक, आरोग्य सेवा, रूग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र, क्र.संआसे/कक्ष-३/टे-५/ दंतचिकित्सक/ उपजिरू/ वसमत/ अपदे-२/०१-०२/१६, दि.५.०१.२०१६.**

शासन शुद्धीपत्रक

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळातील उपजिल्हा रूग्णालय, वसमत, जि. हिंगोली येथील दंत चिकित्सा विभागातील दंत शल्य चिकित्सक, गट-अ, वर्ग-२ आणि दंत सहाय्यक, गट-ड या अस्थाई पदांना दि.२९.०७.२०१५ ते दि.२९.०२.२०१६ या कालावधीपर्यंत मुदतवाढ देण्यास संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयात नमूद या पदांच्या वेतनावरील खर्चाकरीता दर्शविण्यात आलेल्या लेखाशीर्षामध्ये पुढीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

या पदांवरील खर्च सन २०१५-१६ या आर्थीक वर्षाच्या मागणी क्रमांक आर-१ मधील मुख्य लेखाशीर्ष "२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६-सार्वजनिक आरोग्य, ००१-संचालन व प्रशासन, (०१) (०९)- महाराष्ट्र आरोग्य सेवा विकास प्रकल्पांतर्गत ग्रामीण/ कुटीर रूग्णालयांचा जिल्हा रूग्णालयाइतका दर्जा वाढविणे (२२१० ४६२४)" करीता मंजुर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१६०११४१७०३४१९९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok T Uike

Digitally signed by Ashok T Uike
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400001, st=Maharashtra, cn=Ashok T Uike
Date: 2016.01.15 10:29:48 +05'30'

अ.ता.उईके
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
२. सहसंचालक, आरोग्य सेवा (रूग्णालये-राज्यस्तर), मुंबई.

३. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), पुणे.
४. सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (लेखा व लेखापरिक्षा), पुणे.
५. उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळ, औरंगाबाद.
६. महालेखापाल, १/२,महाराष्ट्र (लेखा व लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
७. जिल्हा शल्य चिकित्सक, हिंगोली.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, हिंगोली.
९. वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रूग्णालय, वसमत, जि.हिंगोली.
१०. वित्त विभाग (व्यय-१३, अर्थसंकल्प-१९), मंत्रालय, मुंबई.
११. अवर सचिव /कार्यासन अधिकारी (सेवा-१/ सेवा-५ /अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
१२. निवडनस्ती (आरोग्य- ४).